PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kichak Vadh
Year: 1959

Song: Upvar Jhali Lek Ladaki
Lyricist: G. D. Madgulkar

उपवर झाली लेक लाडकी
लग्नाला आली
उपवर झाली लेक लाडकी
लग्नाला आली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली
सुवर्ण स्तंभावरी बसविली
फिरती मत्स्याकृती
तेलामध्ये बिंब पाहूनी
छेदील हो कोण ती
छेदील त्याला विवाहमाला
घालील पांचाली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली

रतीहूनी ती अतीव सुंदर
सुभगाहून शालिनी
मऊ रेशमी अलख भारतर
ख्यात स्वरूपाहूनी
धनुर्धराच्या मनीची आशा
आव्हाना टपली
धनुर्धराच्या मनीची आशा
आव्हाना टपली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली

स्वयंवराचा भरला मंडप
गर्दी तरी ती किती
देशदेशचे जमले होते
रण शार्दूल नृपती
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली

हत्तीवरूनी जणू चमकली
समूर्त सौदामिनी
आ नजरेने स्फुरले बाहू
वीर सिध्द झाला
वीर सिध्द झाला

अचूक लावूनी बाण तयाने
मत्स्यभेद केला
धनंजयाच्या गळा धन्य ती
वरमाला पडली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली

उपवर झाली लेक लाडकी
लग्नाला आली
स्वयंवराची तिच्या घोषणा
द्रुपदानी केली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*